
ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-5 Issue-5

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



Late. Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.5 Issue-5 Mar- Apr 2024

CONTENTS



| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | Navigating the Terrain of E-Waste Management: Legal Frameworks and Imperatives **Dr. Ranganathaiah C. B** | 1-2 |
| 2 | Human Development Index **Nanwate Niwrutti Narayan** | 3-5 |
| 3 | The Future of Academic Librarianship: Mooc and the Revolution **Dr. Devidas Eknathrao Dadpe** | 6-12 |
| 4 | Digital Marketing for Business Growth **Jyoti Krishna kumar Tiwari, Dr. Sonam Arvind Singh** | 13-17 |
| 5 | Water monitoring system using radio (GSM) modem: An Introduction **Shaikh Asif Karim** | 18-20 |
| 6 | NEP 2020 and Incorporation of Indian Knowledge Systems in Curriculum **Dr. Sanjay B. Salunke** | 21-23 |
| 7 | Foreign Trade of China and India: A Comparative Analysis **Dr. Dnyaneshwar Shankar Wadje** | 24-26 |
| 8 | E-waste in India, Challenges and threats : A review **Shaikh Asif Karim, Sayyed Mujb Hadi** | 27-28 |
| 9 | The Role of Artificial Intelligence (AI) in Supply Chain Management **Shubhangi Rajabhau Amble, Dr. Suhas G. Gopane** | 29-31 |
| 10 | A Review Paper on E-Commerce in India **Dr. Choudhari Rekha Laxmanrao** | 32-33 |
| 11 | Virginia Woolf and Stream of Consciousness Technique **Shri. Mundhe Pravin Dattatraya** | 34-35 |
| 12 | An Analytical Study of Reservation System in India **Mr. Shaikh Moeen Shaikh Naeem, Mr. Pradip L. Gophane** | 36-40 |
| 13 | Application of Generative AI in Accounting **Dr. Lakshkaushik Dattatraya Puri** | 41-44 |
| 14 | Child Marriage and Social condition across the world **Dr. S. S. Sasane** | 45-46 |
| 15 | Constitution and Reservation Policy in India **Dr. Sandhya T. Gadakh** | 47-49 |
| 16 | Connecting the Dots by Coalescing Entrepreneurship and Iot Innovation: The Inception of Smart things **Rupsa Sen, Jyotirmoy Saha, and Kaveri Banerjee** | 50-56 |
| 17 | Role of Maulana Azad in Modernizing Education **Imran Nazar Khan, Syed Hyder Chishti** | 57-59 |
| 18 | Role of Banking in Development of Commerce and Management **Ms. Mohini M. Hirve, Dr. SuhasGopane** | 60-63 |
| 19 | An Empirical study on Online Shopping Behavior of Men in Mumbai city **Doshi Neha Chetan, Dr. Sheetal Mody** | 64-67 |
| 20 | Physical education and student well-being: Promoting health and fitness **Dr. Saudagar Faruk Gafur** | 68-70 |
| 21 | A study of Digital Marketing in India **Dr. Suresh G. Sonawane** | 71-74 |
| 22 | Impact of Online Advertising on Female Consumers **Ashwini Dattu Thanambir** | 75-78 |
| 23 | Advantages of the New National Education Policy 2020 **Dr. Khose Dhananjay Ankushrao** | 79-81 |
| 24 | Recent Developments, Government Initiatives and Prospects for E-Commerce Market in India **Dr. Kishor P. Bholane** | 82-85 |
| 25 | Enhancing Commerce Education through Skill Development Initiatives: A Pathway to Economic Empowerment **Mr. Mangesh D. Jadhav** | 86-87 |
| 26 | Study of Use of Mobile Banking Application for Banking Services in India **Mr. Prashant Kadam, Dr. Suhas Gopane** | 88-90 |
| 27 | Role of Hybrid Workplace in HRM future of India **Dr. Sachin S. Rudrawar** | 91-94 |



Late. Ramesh ... College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

| | | |
|---|---|---|
| 78 | बालविवाहाची कारणे, परिणाम आणि उपाययोजना<br>**प्रा. सुधीर पोकळे** | **272-275** |
| 79 | संत साहित्य व पर्यावरण विचार<br>**डॉ. राजाराम सोनटक्के** | **276-278** |
| 80 | ई-प्रशासन : काळाची गरज<br>**डॉ. एम. एफ. राऊतराहे** | **279-280** |
| 81 | बालविवाह: एक सामाजिक कलंक<br>**डॉ सुनिता टेंगसे,** | **281-283** |
| 82 | हिंदी साहित्य में पर्यावरणीय चेतना<br>**खुडे शुभांगी मनोहर** | **284-286** |
| 83 | भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह<br>**डॉ. रमेश एकनाथ भारुडकर** | **287-289** |
| 84 | मध्ययुगीन भारत<br>**प्रा डॉ. सखाराम वांढरे, श्रीकृष्ण कारभारी गंगावणे** | **290-291** |
| 85 | कॉ. गोदावरी परुळेकर यांचे आदिवासी समाज सुधारणेतील यांचे योगदान<br>**प्रा. भास्कर गोतीस, डॉ. सखाराम वांढरे** | **292-294** |
| 86 | पर्यावरण विमर्श एक परिचयात्मक अध्ययन<br>**सिनगरवार पांडूरंग गिरजप्पा, प्रो. डॉ. हाशमबेग मिर्जा** | **295-297** |
| 87 | भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह<br>**सय्यद तोफिक रब्बानी, प्रा. डॉ. फारुकी मोहम्मद खय्युम** | **298-299** |
| 88 | आपत्ती व्यवस्थापन<br>**प्रो. डॉ. बी. एम. चव्हाण, डॉ. दिपाली दिलीप मस्के** | **300-303** |
| 89 | बालविवाहाचे कारणे आणि परिणाम एक अभ्यास<br>**योगेश ज्ञानेश्वर शिंदे, प्रा. देवकर मनोज बी** | **304-305** |
| 90 | हिंदी कविता में पर्यावरण चेतना<br>**पोपट यशवंत जाधव** | **306-308** |
| 91 | संत साहित्य व पर्यावरण विचार<br>**प्रा. डॉ. गोपीनाथ पांडुरंग बोडखे** | **309-311** |
| 92 | पर्यावरण संरक्षण के प्रति जागरूकता: हिन्दी साहित्य<br>**डॉ. सय्यद शौकत, राधा आत्माराम राठोड** | **312-314** |
| 93 | संत साहित्य व पर्यावरण विचार<br>**डॉ. संदीप भागू चपटे** | **315-318** |
| 94 | संत एकनाथांचे सामाजिक विचार<br>**प्रा. अशोक अलगोंडी** | **319-320** |
| 95 | थोर समाजसुधारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>**पौर्णिमा कल्याण अहिवळे, डॉ. प्रशांत साबळे** | **321-322** |
| 96 | संत साहित्यातून पर्यावरण विचार<br>**वसंत लक्ष्मण पुंड** | **323-326** |
| 97 | संत साहित्य व अर्थ विचार<br>**सागर जिवराज थोरात, डॉ. हाशमबेग मिर्झा** | **327-328** |


Late Ramesh Warpudkar Colleege Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 5 Mar- Apr 2024

# बालविवाह: एक सामाजिक कलंक

डॉ सुनिता टेंगसे
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै रमेश वरपुकर महाविद्यालय सोनपेठ जिल्हा परभणी, महाराष्ट्र
Corresponding Author- डॉ सुनिता टेंगसे
DOI- 10.5281/zenodo.10852232

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

**प्रस्तावना**

सामाजिक समस्या या मानवी समाजा इतक्याच प्राचीन आहेत. सामाजिक समस्या ही संकल्पना विधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, आणि समाजकार्यात वापरल्या जाते. राज्यशास्त्रात प्रशासकीय दृष्टिकोनातून अर्थशास्त्रात आर्थिक दृष्टिकोनातून मानसशास्त्रात मानसिक दृष्ट्या आणि समाजकार्यात उपाययोजना म्हणून या संकल्पनेचा वापर केला जातो समाजशास्त्रात सामाजिक समस्या सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यासल्या जातात. **पीटरवर्सली** यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास सामाजिक समस्या ही संज्ञा समस्याप्रधान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या, समूहाच्या समस्या या वेगवेगळ्या असतात. सामाजिक समस्या आणि वैयक्तिक समस्या यांच्यामध्ये फरक आहे. वैयक्तिक समस्या व्यक्तीपुरते मर्यादित असतात आणि सामाजिक समस्या वैयक्तिक समस्येशी संबंधित नसतात. माझी समस्या या सार्वत्रिक आहेत. सामाजिक समस्याच्या स्वरूपात काळानुसार फरक दिसून येतो. सामाजिक समस्या मानवी समाजाशी संबंधित असतात. सामाजिक समस्या समाजातील स्थिती आहेत, त्यांचे निर्मूलना करिता सामूहिक कृती आवश्यक आहे, त्यावर सामूहिक उपाययोजना केली जाते. समस्या या कुकार्यात्मक क्रिया आहेत, त्याचा समाजावर परिणाम होत असतो. सामाजिक समस्या ही समाजातील बहुतांश लोकांना ग्रासते. समस्या ही संकल्पना समाजातील आदर्श मूल्य प्रमाणे केले या मापदंडांच्या आधारावर मानली जाते. जोपर्यंत एखादी स्थिती समाज अवंतनीय समजत नाही तोपर्यंत त्याची सामाजिक समस्येत निर्मिती होत नाही. सामाजिक समस्या या कालखंड आणि स्थिती सापेक्षा असतात. भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षापेक्षा जास्त कालखंड लोटला आहे तरीही भारतीय समाजात आजही बालविवाह होतात हे नाकारता येणार नाही.

**शोध निबंधाचा उद्देश:**

*बालविवाह म्हणजे काय हे स्पष्ट करणे

*भारतीतिल बाल विवाहाची स्थिती अभ्यासणे

*बालविवाहाची करणे आणि परिणाम जाणून घेणे

*बालविवाह संदर्भात असणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करणे

*बालविवाहाला प्रतिबंध घालण्यासाठी उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असून संदर्भ ग्रंथ पुस्तके मासिके व इंटरनेटवरील माहितीच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली जाणार आहे.

**गृहीत कृत्य:**

भारतात आजही बालविवाह होतात.

**बालविवाह प्रतिबंधा साठी पुढील प्रमाणे प्रयत्न करण्यात आले आहेत:**

19व्या शतकात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, पंडिता रमाबाई यांसारख्या समाजसुधारकांनी ही दुष्ट प्रथा समूळ नष्ट करण्याचे काम केले.वसाहतवादी सरकारने बालविवाहाविरुद्ध काही कायदेशीर उपाय सुरू केले. 1860 मध्ये संमत झालेल्या कायद्याने मुलींचे लग्नाचे वय 10 वर्षे करण्यात आले. पुढे संमतीचे वय अधिनियम, 1891 ने हे वय वाढवून 12 वर्षे केले.

1929 मध्ये मंजूर झालेल्या शारदा कायद्याने मुलींचे लग्नाचे वय 14 वर्षे आणि मुलांसाठी 18 वर्षे केले. हिंदू विवाह कायदा,1955 मध्ये विवाहासाठी मुलींचे वय 18 आणि मुलांसाठी 21 असे नमूद केले आहे.

**बालविवाह प्रतिबंध कायदा (PCMA), 2006** : या कायद्याने बालविवाह प्रतिबंध कायदा, 1929 ची जागा घेतली. हे बालविवाह करणाऱ्या, आयोजित, निर्देशित किंवा प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तीच्या कृत्यांना गुन्हेगार ठरवते आणि 2 वर्षा पर्यंत कारावासाच्या शिक्षेची तरतूद करते आणि INR 1 लाख पर्यंत दंड.बालवधूला संरक्षण देणारे इतर कायदे बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 समाविष्ट करतात ; घरगुती हिंसाचार कायदा, 2005; आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा,

2012 . एक संसदीय स्थायी समिती महिलांसाठी लग्नाचे वय 21 पर्यंत वाढवण्याच्या साधक-बाधक चर्चा होते आहे, ज्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.

भारतीय कायद्यानुसार लग्नाचेमुलीचे वय18 आणी मुलांचे वय 21 वर्षे निश्चित करण्यात आले आहे. परंतु अशी अनेक राज्ये आहेत जी कायद्याला बगल देऊन अशी पावले उचलतात. 2020 नंतर ही आकडेवारी वाढत असल्याचे दिसते. 2021 मध्ये 1050 बालविवाह नोंदवले गेले आहेत आणि ही संख्या 2020 पेक्षा जास्त आहे. म्हणजे दररोज 3 बालविवाह होत आहेत. जर आपण 2011 ते 2021 बद्दल बोललो तर या यादीत या राज्यांमध्ये सर्वाधिक बालविवाहाची प्रकरणे दिसून आली आहेत. 2021 मध्ये 1050 बालविवाह तर 2020 मध्ये 782 प्रकरणे नोंदवली गेली. कर्नाटक- भारतात बालविवाहाची सर्वाधिक प्रकरणे कर्नाटकात आढळून आली असून, तेथे बालविवाहाची ८९४ प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. तामिळनाडू- भारतातील बालविवाहाच्या बाबतीत तामिळनाडू दुसऱ्या क्रमांकावर आहे, जिथे 2021 मध्ये 649 प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. पश्चिम बंगाल- या यादीत पश्चिम बंगाल तिसऱ्या क्रमांकावर आहे, जिथे 2021 मध्ये 619 प्रकरणे नोंदवली गेली. आसाम- बालविवाहाच्या बाबतीत आसाम चौथ्या क्रमांकावर आहे, जिथे 2021 मध्ये 596 प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत.

बालविवाहाच्या बाबतीत महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर आहे. 2021 मध्ये येथे 280 प्रकरणे नोंदवली गेली आहेत. तेलंगणा- बालविवाहाच्या बाबतीत तेलंगणा सहाव्या क्रमांकावर आहे. 2021 मध्ये येथे 248 प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. हरियाणा- बालविवाहाच्या बाबतीत हरियाणा सातव्या क्रमांकावर आहे. 2021 मध्ये येथे 202 प्रकरणे नोंदवली गेली. आंध्र प्रदेश- बालविवाहाच्या बाबतीत आंध्र प्रदेश आठव्या क्रमांकावर आहे. 2021 मध्ये येथे 194 प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. राजस्थान- बालविवाहाच्या बाबतीत राजस्थान 9 व्या क्रमांकावर आहे. 2021 मध्ये येथे फक्त 93 प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत.

१८ वर्षे वयाच्या आधी लग्न करणे हे मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. ते थांबवण्यासाठी कायदे असले तरी ही घातक प्रथा आजही अनेक देशांमध्ये सुरू आहे.बालविवाहामुळे दीर्घकालीन त्रास होऊ शकतो.बालवधू आणि त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याची शक्यता कमी असते आणि त्यांना घरगुती हिंसाचाराचा धोका जास्त असतो. वीस वर्षाच्या मुलींपेक्षा किशोरवयीन मुलींना गर्भधारणेदरम्यान आणि बाळंतपणादरम्यान होणाऱ्या गुंतागुंतांमुळे मृत्यूचा धोका जास्त असतो. त्यांची संतती आयुष्याच्या पहिल्या महिन्यात मृत जन्माला येण्याची किंवा मरण्याची अधिक शक्यता असते. बालविवाह होण्यामागे सांस्कृतिक आणि सामाजिक नियम, गरिबी, शिक्षणाचा अभाव आणि लैंगिक असमानता हि कारणे प्रामुख्याने जबाबदार आहेत.

काही समाजांमध्ये, बालविवाह हे मुलीचे भविष्य सुरक्षित करण्याचा आणि गरिबी किंवा लैंगिक संबंधांपासून संरक्षण करण्याचा एक मार्ग म्हणून पाहिले जाते.तसेच याकडे परंपरा किंवा प्रथा जपण्याचा एक मार्ग म्हणून पाहिले जाते. या सांस्कृतिक आणि सामाजिक सवयी बदलणे कठीण आहे, कारण त्या समाजात खोलवर रुजलेल्या आहेत.गरिबी हा देखील एक प्रमुख घटक आहे, कारण बालविवाहाकडे आर्थिक भार कमी करण्याचा किंवा आर्थिक लाभ मिळविण्याचा मार्ग म्हणून पाहिले जाते. मुलिच्या जबाबदारी मधुन मुक्त होऊ असे वधु पित्यास वाटते आणि वराच्या कुटुंबाला हुंड्याच्या स्वरूपात आर्थिक मदत मिळते आणि घरी आणि शेतात कामासाठी हक्काची व्यक्ती मिळते हि भावना आजही पहावयास मिळते.

**सारांश:**

बालविवाहामुळे मुलांच्या हक्कांचे उल्लंघन होते आणि त्यांना हिंसा, शोषण आणि अत्याचाराचा सामना करावा लागतो. बालविवाहाचा मुली आणि मुले दोघांवरही परिणाम होतो, परंतु मुलींवर त्याचा परिणाम विषम प्रमाणात होतो.

बालविवाहाला आळा घालण्यासाठी अनेक पध्दतींची उपाययोजना आवश्यकता आहे ज्यामुळे मुली आणि स्त्रियांबद्दलचे सामाजिक नियम आणि दृष्टिकोन बदलू शकतात. बाल संरक्षण प्रणाली मजबूत करणे आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी करणे, तसेच मुलींना शिक्षण, आरोग्य सेवा आणि आर्थिक संधी प्रदान करणे आणि याबाबत समाजातील सर्व स्तरातील लोकांना बालविवाह मुळे शारीरिक मानसिक आरोग्य कसे धोक्यात येते या बाबतीत जनजागृती करण्याच्या नितांत आवश्यक आहे. या वर प्रतिबंध घालण्यासाठी ग्रामीण स्तरावर बालविवाह प्रतिबंधक कायद्या विषयी जनजागृती करून मुलीचे बालपण जपून,त्यांची शारीरिक आणि मानसिक सर्वांगीण वाढ कशी होईल यावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.बालकल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना संबंधित घटकांपर्यंत पोहोचतात की नाही? याचाही विचार होणे आवश्यक आहे. शासनाच्या 'शुभमंगल विवाह' आणि अन्य योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांबरोबर सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला तरच या समस्येवर कायमचा इलाज होऊ शकेल.

नोबेल शांतता पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांनी स्थापन केलेली कैलाश सत्यार्थी चिल्ड्रन्स फाउंडेशन

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

(KSCF) ही भारतातील सर्वात विश्वासार्ह एनजीओ आहे जी बालविवाह रोखण्यासाठी काम करते. KSCF ची बालविवाह एनजीओ गेली 40 वर्षे देशभरातील निष्पाप आणि असुरक्षित मुलांच्या बालपणाचे रक्षण करण्यासाठी कार्यरत आहे.भारतातील बालविवाह संपवण्यासाठी श्री. सत्यार्थी यांचे पथदर्शी कार्य सुरू आहे.आणि भारतीय या सामाजिक विचारांचे रोपण होण्याची आवश्यकता आहे की मुलींची सर्वांगीण वाढ झाल्याविना त्यांचा विवाह होता कामा नये, असे झाल्यासच भारत देशाला सुदृढ माता आणि सुदृढ बालकांचा वारसा लाभेल आणि भारताचे भविष्य उज्वल होण्यास मदत होईल यात शंका नाही.

**संदर्भसुची:**


1. डॉ मनावर डी एस, समाज प्रश्न आणि समस्या अरुणा प्रकाशन लातूर 2003 पान न 3,4
2. डॉ काचोळे दा.धो. भारताच्या विघटनात्मक समस्या कैलास पब्लिकेशन औरंगाबाद 1998 पान न. 9,10
3. प्रा.मोरे अशोक, भारतीय सामाजिक समस्या, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, 2015 पान नं. 4,5
4. https://hindi.newsclick.in/Poverty-is-also-the-reason-for-child-marriage
5. https://apnabharat.org/education/education-when-will-the-registration-for-ugc-net-june-2024-start-know-426398?infinitescroll=1
6. https://www.manovichar.com/2022/10/Child-Marriage-Causes-effects-prevention.html?m=1
7. https://marathi.indiatimes.com/editorial/ravivar-mata/balvivah/articleshow/46973426.cms


Late.Ramesh Warpudkar College Sonpeth Dist.Parbhani (M.S.)

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani